**प्रकल्प प्रवर्तक मे. क्लासवन ॲग्रो बायोटेक आणि फर्टिलायझर्स प्रा. लिमिटेड, गट नं. २१४८, पोस्ट-येळावी, तालुका-तासगांव, जिल्हा - सांगली (४१६ ३१९), महाराष्ट्र, यांच्या एसएसपी- ३००.० मे. टन प्रतिदिन आणि जीएसएसपी - २००.० मे.टन प्रतिदिन खते उभारणीबाबत प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीबाबतचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. क्लासवन ॲग्रो बायोटेक आणि फर्टिलायझर्स प्रा. लिमिटेड, गट नं. २१४८, पोस्ट-येळावी, तालुका-तासगांव, जिल्हा - सांगली (४१६ ३१९), महाराष्ट्रयांच्या एसएसपी- ३००.० मे.टन प्रतिदिन आणि जीएसएसपी- २००.० मे.टन प्रतिदिन खते उभारणीबाबत प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणी दिनांक, २२ जुलै, २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प स्थळावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-५३/२०२१, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०७१४-एफटीएस-००९१, दिनांक १४-०७-२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठन करण्यात आली.

१) डॉ. अभिजीत चौधरी, (भाप्रसे) - अध्यक्ष
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
सांगली.

२) श्री रविंद्र आंधळे, - सदस्य
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

३) श्री नवनाथ अवताडे - आयोजक
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सांगली.

श्री. नवनाथ अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सांगली तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी डॉ. अभिजीत चौधरी, भाप्रसे, जिल्हा दंडाधिकारी, सांगली तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती, श्री रविंद्र आंधळे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीसमिती, सर्व शासकीय अधिकारी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, पत्रकार, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन कोविडच्या

पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारिरीक तापमान बैठकीच्या प्रवेशव्दारा जवळ तपासले जात असून बैठकीच्या जागी सॅनिटायझरचा वापर, प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीसमिती यांनी समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक, यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री नवनाथ अवताडे यांनी असे सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. क्लासवन ॲग्रो बायोटेक आणि फर्टिलायझर्स प्रा. लिमिटेड, गट नं. २१४८, पोस्ट-येळावी, तालुका-तासगांव, जिल्हा - सांगली (४१६ ३१९), महाराष्ट्र यांच्या एसएसपी- ३००.० मे. टन प्रतिदिन आणि जीएसएसपी- २००.० मे. टन प्रतिदिन क्षमतेचा खत उभारणी प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणी आयोजित करण्यासाठीचा अर्ज मप्रनि मंडळास प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसरा बाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग ब ५ (ए) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीयबदल मंत्रालय, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक, यांनी असे स्पष्टीकरण दिलेकी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावनाजाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करुन त्यानुसार प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन सादर केलेला आहे.

पर्यावरण, वने व हवामान बदलमंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०२० च्या कार्यालयीन टिप्पणीनुसार कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार उपस्थितांनी बैठकीत मुखपट्टी, दोन व्यक्तींमध्ये अंतर पाळण, सॅनिटायझरचा वापर बंधनकारक करण्यात आलेला आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, सांगली यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र "सकाळ" यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द "टाइम्स ऑफ इंडिया" यात इंग्रजीत दिनांक २२-०६-२०२१ रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात प्रकल्पाने बाधित होणारे स्थानिक नागरिक, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीकाही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी वा तोंडी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पा विषयीचा दस्तावेज- पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रतशासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्यापर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिललाईन, नागपूर - ४४० ००१,मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-सांगली, मुख्य कार्यकारी अधिकारी -जिल्हा परिषद, सांगली, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, सांगली, तहसील कार्यालय-तासगांव, जिल्हा - सांगली, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय- येळावी, निमणी, तुरची, जुळेवाडी, तावदरवाडी, तालुका - तासगांव, जिल्हा - सांगली, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - कोल्हापूर, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली, पर्यावरण व वातावरण बदल विभाग, मंत्रालय, मुंबई आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत उपप्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, सांगली यांना एक ही सूचना/तक्रार नोंदविण्यात आलेली किंवा प्राप्त झालेली नाही.

श्री. नवनाथ अवताडे, आयोजक, यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

श्री नवनाथ अवताडे, आयोजक, यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाच्या संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापनाच्या योजने बाबत सादरीकरण करण्याबाबत विनंती केली. त्यानुसार तांत्रिक सल्लागार यांनी सविस्तर सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाचा एकूण खर्च हा १७.०७ कोटी एवढा खर्च येणार असून बांधकाम टप्प्यात प्रकल्पात ५० व्यक्तींना रोजगाराची संधी मिळणार असून प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ५० व्यक्तीना कायमचा तर १५० व्यक्तींना कंत्राटी पध्दतीने रोजगार उपलब्ध होईल. प्रकल्प सल्लागार यांनी विविध प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती दिली.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सविस्तर सादरीकरण केलेले असुन पर्यावरणाच्या दृष्टीने सर्व मुद्दे स्पष्टपणे सादर केलेले आहेत, उपाययोजनाही सांगितलेल्या आहेत. तरी परिसरातील नागरिक जे उपस्थित आहेत, त्यांनी सदरहू प्रकल्पाबाबतच पर्यावरणाचे काही आक्षेप, सूचना, टिका टिप्पणी असल्यास त्या उपस्थित कराव्यात अशी विनंती केली.

<u>खालील व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरण विषयक जाहिरजन सुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-</u>

१) <u>श्री सुदर्शन, हैद्राबाद, आंध्र प्रदेश, पर्यावरण कार्यकर्ताः-</u>

प्रश्न -

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाच्या १० कि.मी.परिघातील क्षेत्रातील पाणी, हवा व इतर सर्व पर्यावरणीय सर्वेक्षण केलेले आहे. त्याचप्रमाणे प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील क्षेत्रातील पीक उत्पादन स्थिती, आरोग्याची स्थिती (health status) याबाबत निर्णय घेण्यात यावा. तरी प्रकल्प प्रवर्तकांना काही सूचना देण्यात येतातः-

स्थानिक लोकांना रोजगाराची गरज आहे. बेरोजगारी हे देशातील मोठे प्रदूषण आहे. मात्र लहान मुलांना कामावर आणू नका. आजची मुले हे उद्याचे देशाचे नागरिक आहेत. स्थानिक वनस्पतींचे प्रजनन केले पाहिजे. सीएसआर निधी हा प्राथमिक शिक्षणासाठी आणि वॉटर पार्कसाठी खर्च करणे बाधित गावात खर्च करण्यात यावा. पर्यावरणाची हानी न करता सदरहू उद्योग कार्यरत करावा. मी प्रकल्पाच्या स्थापनेसाठी पाठिंबा देत आहे.

उत्तर-

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उपस्थित सूचनांचे स्वागत केले. त्यांनी सांगितले ह्या सर्व सूचनांचा विचार आम्ही पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात केलेला आहे. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की त्यांनी लेखी आक्षेप नोंदविलेला आहे. आमची तज्ज्ञ समिती यांनी वनस्पतीबाबत सर्वेक्षण केले, त्यावेळीस्थानिकांनी दिलेल्या सूचनांचा विचार आम्ही पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात केलेला आहे. त्यांनी सांगितले की या प्रकल्पामुळे कायमस्वरुपी रोजगार निर्मिती ही २०० लोकांची होणार आहे.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणी समिती यांनी उपस्थित स्थानिकांना त्यांच्या प्रकल्पाविषयी काही शंका, सूचना वा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. त्यांनी येथे ग्रामपंचायत सदस्य, लोकप्रतिनिधी असतील तर त्यांनीही शंका, सूचना वा आक्षेप असल्यास त्या त्यांनी नोंदवाव्यात असे आवाहन केले.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणी समिती यांनीही उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. त्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांना त्यांचे काही प्रश्न असल्यास तेही विचारण्याची सूचना केली.

२) श्री. नवनाथ अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.न. मंडळ, सांगली तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीः-

प्रश्न-

सादरीकरणामध्ये टाकाऊ घन कचरा हा प्रकल्पाच्या बाहेर प्रकिया करणार असे नमुद केलेले आहे. त्याबाबत खुलासा करण्यात यावा.

उत्तर-

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की पर्यावरण घन कचरा अधिनियम, २०१६ नुसार जो घातक घन कचरा गोळा करुन तो म.प्र.नि.मंडळाने मान्य केलेल्या अधिकृत्त संस्थेस पुढील प्रक्रिया आणि विल्हेवाट लावण्यासाठी दिला जाईल. प्रकल्पात घनकचरा जो बायोडिग्रेडेबल आणि नॉन- बायोडिग्रेडेबल असे वर्गीकरण करुन बायोडिग्रेडेबल कचारा हा गांडूळ खतात टाकला जाईल. त्याचा वापर प्रकल्पाच्या आवारातील हरित पट्टा विकासासाठी करण्यात येईल. तर नॉन- बायोडिग्रेडेबल कचरा हा अधिकृत्त पुनर्वापर कर्त्यांना विकला देण्यात येईल. प्रक्रियेत तयार होणारा घातक नसलेला घनकच-याची आवाराच्या बाहेर विल्हेवाट लावण्यात येईल. ज्या ठिकाणी लोलाईंग क्षेत्र आहे, तेथील कंत्राट दारांना तो विकसन करताना दिला जाईल. नियमांप्रमाणे त्यास मान्यता आहे. कारण संपूर्ण फ्लोरिनवर आधारित असणारे स्क्रब केलेले वस्तूमान पुन्हा वापरले जाते. सुमारे १.५ मे.टन प्रतिदिवस फिल्टर केलेले केक उत्पादनात फिलर म्हणून वापरले जातील.

कोळसा / ब्रिकेटच्या ज्वलनामुळे तयार होणारी फ्लाय एश (पीसीएममध्ये गोळा केले जाणारे पीएम) आणि तळाची राख ही स्थानिक वीट उत्पादकांना विकली जाईल.

यावेळी आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणी समिती यांनी उपस्थितांना माहिती दिली की जनसुनावणी सुरु होण्या अगोदर अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणी समिती यांनी अस्तित्वात प्रकल्पाची पाहणी केलेली आहे. पाहणीत काही त्रुटी आढळून आलेल्या आहेत. कच्चा माल साठवण्यासाठी आच्छादित शेड केलेले नाहीत, पावसाळ्यात जे पाणी येते, त्याची गळती होऊन जवळील विहिरीत किंवा जमिनीपासून दूर जाऊन एकत्रित (मिक्स) होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आजूबाजूच्या विहिरी, बोअरवेल, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बाधित होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. तरी प्रकल्प प्रवर्तकांना सूचना करण्यात येते की कच्च्या मालाच्या साठवणूकीची आपण योग्य ती तरतुद, व्यवस्था करावी. त्याचा उल्लेख, अंतर्भाव हा इतिवृत्तात होणार असल्याने आपणास सूचना देण्यात येते की आपण त्याबाबत उपाययोजना करुन तसा प्रस्ताव सादर करावा.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आम्ही हिवाळ्याच्या मोसमात सर्वेक्षण केलेले आहे. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा संपूर्णपणे विचार करण्यात आलेला नव्हता.

त्याचप्रमाणे आम्ही इतर खतांचे कारखाने कोणती उपाय योजना अंगिकारतात याचा अभ्यासही आम्ही करत आहोत. तरी त्याचा अंतर्भाव अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात करण्यात येईल.

३) <u>डॉ. आर.आर.मातकर, क्षेत्र अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, सांगलीः-</u>

प्रश्न-

या प्रकल्पात मुख्य कच्चा माल हा सल्फ्युरिक ॲसिड आहे. प्रस्तावित प्रकल्पात त्याचे प्रमाण (Concentration) किती असेल? त्याची साठवणूक क्षमता आणि उपाय योजना काय असेल?

उत्तर-

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की या प्रकल्पात मुख्य कच्चा माल हा सल्फ्युरिक ॲसिड आहे. त्याचे प्रमाण हे सुमारे ११८.० टन प्रति दिवस राहिल, आणि १,००० टनाची साठवणूक क्षमता वाढविण्यात येणार आहे. त्यासाठी अत्याधुनिक शास्त्रीय तंत्रज्ञान कार्यान्वित करण्यात येईल. त्यामध्ये डाईक भिंत बांधण्यात येईज व चारी बाजूने डाईक भिंत वापरण्यात येईल. समजा तो टँक संपूर्णपणे रस्त्यात आला, तरीही त्याच्यातून ॲसिड बाहेर येणार नाही. त्यासाठी लागणारी पपिंग, दुहेरी ड्रेनव्हॉल्व्ह ही सर्व यंत्रणा पुरविण्यात येईल. सर्व बॅकअप हा जनरेटरव्दारे पुरविला जाईल. त्यामुळे सल्फ्युरिक ॲसिडची गळती होणार नाही.

४) <u>श्री एन. बच्चन, हैद्राबादः-</u>

यांनी त्यांची सूचना सांगण्यास सुरवात केल्यानंतर जिल्हादंडाधिकारी, सांगली तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी त्यांना प्रश्न विचारला की आपण हैद्राबादहून येथे का आलेला आहात? त्यांनी सांगितले की मी पर्यावरणवादी आहे. त्यावेळी अध्यक्ष यांनी म्हणून आपण दुस-या राज्यातील जनसुनावणीस फक्त हजेरी लावावी काय? आपले वैध, सामाजिक स्थान Locus Standi (लोकस स्टँडी) काय आहे? आपणास माहित आहे की प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील बाधित क्षेत्रातील लोकांसाठी ही जनसुनावणी आहे. तर आपण दुस-या राज्यातून येण्याची काय गरज आहे? जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आयोजक, यांना याबाबत काळजी पूर्वक नियोजन, संबंधित व्यक्तीचे वैध, सामाजिक स्थान

Locus Standi (लोकस स्टँडी) करण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी आदेश दिले की यांचे येथील उपस्थिती ग्राह्य धरु नये व त्यांनी नोंदविलेले आक्षेपांचा इतिवृतात समावेश करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे त्याबाबत पर्यावरण कायद्यांतर्गत तरतुद तपासण्यात यावी.

५) <u>सौ. वर्षा कदम, क्षेत्र अधिकारी, प्रतिनिधी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कोल्हापूर</u>

प्रश्न-

प्रकल्पात घातक कचरा साठवणूकीसाठी काय उपाययोजना करण्यात येतील आणि किती प्रमाणात घातक कचरा उत्पन्न होईल?

<u>उत्तर-</u>

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की सल्फ्युरिक ॲसिडची सिंगल वन रिॲक्शन (प्रतिक्रिया) आहे. त्यासाठी विशिष्ट प्रमाण वापरले जाईल. ते घातक कच-यात समाविष्ट असल्याने आम्हांला साठवणूक टाकी बांधाविच लागेल. तरी २००.० मीटर्सचा भाग हा साठवणूक टाकी म्हणूनच विकसित करण्यात येईल. ४५ दिवस साठवणूक क्षमता असेल. साठवणूक टाकीजवळ अग्निशमन यंत्रे पुरविण्यात येतील. सल्फ्युरिक ॲसिड हातळणीसाठी एसओपी तयार करण्यात येईल.

आयोजक यांनी उपस्थितांचे काही प्रश्न, सूचना, आक्षेप आहे काय याबाबत विचारण केली. उपस्थितांकडून कोणाताही प्रतिसाद नव्हता. आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्षांना आपले मनोगत व्यक्त करण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिरजन सुनावणी समिती यांनी सांगितले की आज आपण प्रकल्प प्रवर्तक मे. क्लासवन ॲग्रो बॉयोटेक व फर्टिलायझर्स प्रा. लिमिटेड यांच्या प्रस्तावित एसएसपी- ३००.० मे. टन प्रति दिवस आणि जीएसएसपी- २००.० मे. टन प्रति दिवस ब्राऊनफिल्ड प्रकल्पाच्या जनसुनावणीसाठी जमलो आहोत. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण केले व नंतर म.प्र.नि.मंडळाच्या अधिका-यांनी तांत्रिक बाबींविषयी प्रश्न विचारले आहेत. प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रदूषण होऊ नये म्हणून भविष्यातील उपाय योजनांचे त्यांनी संपूर्णपणे स्पष्टीकरण दिलेले आहे. जनसुनावणीस स्थानिक उपस्थितांकडून कोणाताही आक्षेप असल्याचे दिसून आलेले नाही. प्रकल्पाची माहिती जनतेस देणे, त्यातील तांत्रीक व पर्यावरणीय मुद्दे हे जनतेस सांगणे व जनतेस या प्रकल्पामुळे होणारा फायदा अवगत करणे हा जनसुनावणीचा उद्देश असतो. राज्याबाहेरील

काही व्यक्तींनी प्रकल्पाच्या बाजूने काही सूचना केलेल्या आहेत. जनसुनावणी अधिनियमातील तरतुदी तपासून त्याची नोंद इतिवृतात घेण्यात यावी. अन्यथा ती अपेक्षित नसेल तर नोंद घेण्यात येऊ नये. स्थानिक रहिवाशांना त्यांच्या काही सूचना, आक्षेप लेखी स्वरुपात नोंदवायच्या असल्यास ते नोंदवू शकतात. प्रकल्प प्रवर्तकांना म.प्र.नि.मंडळ अधिका-य्रांनी कार्यरत प्रकल्पात काही सुधारणा करण्याची गरज असल्याचे सांगितले आहे. त्याशिवाय, प्रस्तावित प्रकल्पात जी काही काळजी घेण्याची गरज आहे, त्या सर्व घेतल्या जातील अशी मी अपेक्षा करतो. त्यासाठी म.प्र.नि. मंडळ अधिका-यांनी जरुर पाहणी करावी व जनसुनावणीचे इतिवृत्त सादर करावे. आता उपस्थितांकडून कुठलाही प्रतिसाद नसल्यास आजची जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

आयोजक यांनी समितीचे अध्यक्ष, सदस्य, कारखान्याचे पदाधिकारी, तांत्रिक सल्लागार व उपस्थित नागरिकांचे सुनावणी सुरळित पार पाडण्यासाठी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानून मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

सुनावणीची कार्यवाही सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दु. १.०० वाजता समाप्त झाली.

(नवनाथ अवताडे)
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, सांगली,

(रविंद्र आंधळे)
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर

(डॉ. अभिजीत चौधरी, भाप्रसे)
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा जिल्हादंडाधिकारी सांगली,
जिल्हा सांगली